**जागतिक दृष्टिकोनातून भारतीय इतिहासाचे अध्ययन करणारा अनोखा प्रकल्प**

भारत आणि प्राचीन विश्व अध्ययन दालनाची रचना सामायिक मानवी इतिहास भारतीय दृष्टिकोनातून मांडण्यासाठी करण्यात आली. हा आगळा-वेगळा प्रकल्प छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, मुंबई या संस्थेचे सहयोगी संस्था - ब्रिटिश म्युझियम आणि स्टॅट्लिशेन म्यूझीन त्सू बर्लिन यांच्या सहयोगाने संकल्पित केला आहे. भारतीय शाळा आणि विद्यापीठांमध्ये वैश्विक इतिहास अध्ययनाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देश्याने या प्रकल्पची निर्मिती केली आहे.

सी. एस्. एम्. व्ही. एस्. येथे महासंचालक श्री सव्यसाची मुखर्जी यांच्या निर्देशनाखाली १५ महतत्त्वाच्या सहयोगी संस्थांच्या सहयोगाने हा प्रकल्प पूर्णत्वास आला आहे. हा प्रकल्प गेटीच्या शेअरिंग कलेक्शन प्रोग्रॅम (संग्रहाचे आदान प्रदान) कार्यक्रमांतर्गत असून नील मॅकग्रेगर आणि माहरुख तारापोर हे या प्रकल्पाचे सल्लागार आहेत. सांस्कृतिक मंत्रालय भारत सरकारने या प्रकल्पाला मान्यता दिली आहे.

या दालनात भारत, इजिप्त, मेसोपोटेमिया, चीन, पर्शिया, ग्रीस व रोम येथील ३०० हून अधिक पुरातत्त्वीय कलावस्तू प्रदर्शित आहेत. अधिकतर युवकांसाठी प्राचीन विश्वाबद्दल प्रत्यक्ष जाणून घेण्याची ही पहिली संधी असावी. या प्रकल्पात जागतिक को-क्युरेशन (सह-अभिरक्षण) म्हणजेच जगभरातील विविध संग्रहालयांच्या अभिरक्षकांनी या प्रकल्पाचे अभिरक्षण केले आहे. ज्यामुळे संग्रहलये आणि विद्यापीठांमधील वैश्विक सहयोग दृढ झाला आहे. या

प्रकल्पांतर्गत नालंदा शैक्षणिक केंद्र सुरू करण्यात आले आहे. तसेच 'म्युझियम ऑन व्हील्स' फिरते संग्रहालय आणि ट्रंक म्युझियम या उपक्रमांच्या माध्यमातून हा प्रकल्प मुंबई जवळच्या दुर्गम ठिकाणांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न आहे.

**ऐतिहासिक संबंध: भारत आणि प्राचीन विश्व अभ्यास दालन**

संस्कृती हे अंतिम गंतव्य स्थान नसून तो एक निरंतर प्रवास आहे. हे अभ्यास दालन आपल्याला प्राचीन जगाकडे केवळ भूतकाळात हरवलेली गोष्ट म्हणून नव्हे, तर आपल्या वर्तमानाचा आधारस्तंभ आणि भविष्याची प्रेरणा म्हणून पाहण्यासाठी प्रोत्साहित करते. संघटित समुदायांपासून ते सर्वात प्राथमिक स्वरूपांतील शासनव्यवस्था, न्यायप्रणाली आणि संस्कृती या मानवी समाजाला आकार देणाऱ्या महत्त्वपूर्ण टप्प्यांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न या दालनात करण्यात आला आहे. जगभर मानवी संस्कृतींचा विकास झाला. या संस्कृती भिन्न असल्या तरी व्यापार, कल्पना आणि सामायिक मूल्यांद्वारे एकमेकांशी जोडलेल्या होत्या. या वैश्विक आदानप्रदानात प्राचीन भारताने महत्त्वाची भूमिका बजावली.

अभ्यास करून निवडलेल्या कलाकृतींच्या माध्यमातून, हे दालन भूतकाळातील अशा संकल्पनांवर प्रकाश टाकते ज्यांचा सध्याच्या काळातही संबंध आहे आणि

ज्या दर्शकांमध्ये विशेषतः विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा, चिंतन आणि अध्ययनाची प्रेरणा निर्माण करतात. या दालनाच्या शेवटच्या भागात पश्चिमेकडील अलेक्झांड्रिया आणि पूर्वेकडील नालंदा या प्राचीन विद्येच्या केंद्रांची झलक पाहायला मिळते जी मानवाची ज्ञानाची कालातीत आस दर्शविते.

**जागतिक सह-अभिरक्षणाचे एक अद्वितीय उदाहरण.**

'भारत आणि प्राचीन विश्व अभ्यास दालन' हा एक आंतरखंडीय सहयोगातून साकारलेला शैक्षणिक उपक्रम आहे. यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, जे. पॉल गेटी म्युझियम, ब्रिटिश म्युझियम, स्टाटलिशे म्युझीन सु बर्लिन, म्युझियम रिटबर्ग (झुरिक), दर अल-अथर अल-इस्लामीय्याह, अल-सबा कलेक्शन (कुवेत), बेनाकी म्युझियम (अथेन्स) आणि एफोरेट ऑफ अँटीक्विटीज ऑफ अथेन्स,  सांस्कृतिक मंत्रालय, ग्रीस.  एफोरेट ऑफ अँटीक्विटीज ऑफ अथेन्स, ग्रीसच्या सांस्कृतिक मंत्रालयाच्या 'एफोरत ऑफ अँटिक्विटीज ऑफ अथेन्स' या संस्था एकत्र आल्या आहेत. या उपक्रमाला भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाचे सक्रिय पाठबळ लाभले आहे. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण, राष्ट्रीय संग्रहालय (नवी दिल्ली) तसेच महाराष्ट्र, प्रयागराज, लखनऊ, मथुरा,

कोलकाता आणि पाटणा येथील प्रमुख वस्तुसंग्रहालयांच्य संग्रहातील प्राचीन कलाकृतीही या दालनात प्रदर्शित करण्यात आल्या आहेत.

भारताला केंद्रस्थानी ठेवून साकारलेल्या या दालनाचे कथानक छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयाचे अभिरक्षक, आंतरराष्ट्रीय सहयोगी वस्तुसंग्रहालये आणि ज्या प्राचीन प्रदेशांतील वस्तू प्रदर्शित आहेत त्यांचा अभ्यास केलेल्या विद्वानांच्या सामूहिक विचारमंथनातून विकसित झाले आहे. प्रत्येक कलाकृतीची निवड आणि तिचे भारतीय प्रेक्षकांसाठी अर्थस्पष्टीकरण सहयोगी संस्थांच्या संबंधित तज्ज्ञांनी सामूहिकरीत्या केले आहे. हा जागतिक सह-अभिरक्षणाचा उपक्रम अभूतपूर्व आहे. प्रख्यात विद्वानांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकल्पाने ऐतिहासिक अचूकता, बौद्धिक सखोलता आणि जागतिक संदर्भ यांचा समतोल साधत, भारतीय दृष्टिकोन प्रभावीपणे जपला आहे.

**प्रकल्पातील सहयोगी**

*प्रकल्पाची संकल्पना आणि सादरीकरण करणाऱ्या संस्था:*

छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, मुंबई

या महत्त्वाकांक्षी संकल्पनेला दिलेल्या पाठिंब्याबद्दल तसेच भारतीय वस्तुसंग्रहालये आणि विद्यापीठांचा सहभाग प्राप्त करण्यासाठी दिलेल्या सहकार्याबद्दल आम्ही भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाचे मनःपूर्वक आभारी आहोत.

*सह अभिरक्षणात सहभागी संग्रहालये:*

१. छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, मुंबई

२. द ब्रिटिश म्युझियम, लंडन

३.  स्टाटलिशे म्युझीन सु बर्लिन, प्रेटसिशर कुल्टुरबेझिट्स

४.  म्युझियम रिटबर्ग, झुरिक

५. द बेनाकी म्युझियम, अथेन्स

*खालील वस्तुसंग्रहालयांच्या सहयोगाने*

प्रदर्शनासाठी आपल्या संग्रहातील कलाकृती देणारी आंतरराष्ट्रीय वस्तुसंग्रहालये

१. द ब्रिटिश म्युझियम, लंडन

२. स्टाटलिशे म्युझीन सु बर्लिन, प्रेटसिशर  कुल्टुरबेझिट्स

३. म्युझीयम रिटबर्ग, झ्युरिक

४. दर अल-अथर अल-इस्लामीय्याह, अल-सबाह संग्रह, कुवैत

५. द बेनाकी म्युझियम, ग्रीस

६. द एफोरेट ऑफ अँटीक्विटीज, अॅथेन्स शहर

प्रदर्शनासाठी आपल्या संग्रहातील कलाकृती देणारी भारतीय वस्तुसंग्रहालये

१. भारतीय पुरातत्व सर्वेक्षण

२. राष्ट्रीय संग्रहालय, नवी दिल्ली

३. पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, महाराष्ट्र शासन

४. अलाहाबाद म्युझियम, प्रयागराज

५. इंडियन म्युझियम, कोलकाता
६. राज्य संग्रहालय, लखनऊ
७. राजकीय संग्रहालय, मथुरा
८. द बिहार म्युझियम, पाटणा

'युनिव्हर्सिटी ॲकॅडेमिक प्रोग्राम' हा शैक्षणिक कार्यक्रम छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, मुंबई यांनी केंब्रिज युनिव्हर्सिटीच्या 'ग्लोबल ह्युमॅनिटीज प्रोग्राम' सोबत ज्ञान भागीदार म्हणून सहयोग करून संकल्पित आणि कार्यान्वित केला आहे.

**मुख्य साहाय्य: द गेटी**

अतिरिक्त साहाय्य: सिटी